अंतिम हुकुमनामा. क्र. १/२०२५.
कल्पना वि. अशोक व इतर.
MHKO150006922025.

## निशाणी क्रमांक १३ खालील आदेश.

धनको यांनी प्रस्तुतचा अर्ज नि.दि.दा. क्र. ५६/२०१६ च्या हुकुमनाम्याप्रमाणे दावा घर मिळकत १/ब चे न्यायालयीन आयुक्तामार्फत विभाजन सुचविण्याबाबत नियुक्ती करण्याकरीता दाखल केला आहे. धनकोच्या कथनाप्रमाणे, सदर न्यायनिर्णया प्रमाणे तिला दावा मिळकतीमध्ये १/३ हिस्सा देण्यात आलेला आहे. सबब, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी करीता तीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. ऋणको क्र.१ याला मूळ दरखास्तीची नोटीस मिळून देखील तो हजर झालेला नसल्यामुळे प्रस्तूत दरखास्त त्याच्या विरोधात एकतर्फा चालवण्यात आली आहे. तसेच ऋणको क्र.२ याने प्रस्तूत दरखास्तीकामी हजर होऊन देखील म्हणणे दिलेले नसल्यामुळे प्रस्तूत अर्ज त्याच्या म्हणण्याशिवाय चालवण्यात आला आहे.

३. धनकोचे विधिज्ञ श्री. चव्हाण यांच्या वतीने श्री. जाधव यांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज आणि त्यासोबतच्या हुकुमनाम्याचे अवलोकन केले. नि.दि.दा. क्र. ५६/२०१६ मधील आदेशाप्रमाणे दावा मिळकत १/ब चे सरस–निरस मानाने वाटप होण्याबाबत आदेशित करण्यात आलेला आहे. त्यामुळे धनकोची मागणी मान्य करणे न्यायोचित ठरते.

४. धनकोच्या विधिज्ञांना दावा मिळकत १/ब चे वाटप सुचविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून त्यांच्या मागणीप्रमाणे विधिज्ञांचे नाव सुचविण्याबाबत विचारण्यात आले असता. त्यांनी विधिज्ञ श्री. ए. बी. घोरपडे, उत्तूर यांच्या नावाची शिफारस केली आहे. विधिज्ञ श्री. ए. बी. घोरपडे न्यायालयात हजर असल्यामुळे त्यांच्याकडे न्यायालयीन आयुक्त म्हणून काम करण्यास इच्छुक असल्याबाबत विचारणा केली असता त्यानी सहमती दर्शविली आहे. सबब, नि.दि.दा. ५६/२०१६ च्या दावा मिळकत १/ब चे वाटप सुचविण्यासाठी विधिज्ञ श्री. ए. बी. घोरपडे यांची नियुक्ती करण्यात येत असून धनको व ऋणको यांनी त्यांचे कामकाज शुल्क ३,०००/– रुपये दयावेत. सबब, मी वाटणी कायदयासह दिवाणी प्रकिया संहितेच्या आदेश २१ अंतर्गत असलेल्या तरतुदी

विचारात घेवून खालीलप्रमाणे अंतीम आदेश करत आहे.

**आदेश**

**१.** नि.दि.दा.५६/२०१६ मधील दावा मिळकत १/अ आणि १/ब घर परडयांचे वाटप सुचविण्यासाठी विधिज्ञ श्री. ए. बी. घोरपडे, उत्तूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येते.

**२.** धनको व ऋणको यांनी न्यायालयीन आयुक्त विधिज्ञ श्री. ए. बी. घोरपडे यांना आवश्यक ती कागदपत्रे देवुन सहकार्य करावे.

**३.** धनको व ऋणको यांनी न्यायालयीन आयुक्तांच्या शुल्काचे ३,०००/– रुपये प्रत्येकी निम्मे निम्मे वाटून दयावेत.

**४.** न्यायालयीन आयुक्त विधिज्ञ श्री. ए. बी. घोरपडे यांनी नि.दि.दा. ५६/२०१६ मधील महागोंड, ता. आजरा ग्रामपंचायत हद्दीतील दावा मिळकत १/ब ग्रामपंचायत घर मिळकत क्र. ३०४ च्या सरसनिरस विभाजनाबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मोजमाप व नकाशासह दिनांक १५.०१.२०२६ पर्यंत सादर करावा.

**५.** संबंधित लिपिकांनी आदेशाची पुर्तता करण्यासाठी योग्य तो पत्रव्यवहार करावा.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

न्या. अ. सं. क्र. महा.०२८९७

दिनांक – १२.१२.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.